मूल्य ३० रु./पृष्ठे १०४
मे २०१७
वर्ष १० वे/अंक ५

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!






चित्रे- विजयराज बोधनकर यांची...

## शरद पवार यांचा बारामतीत 'नागरी सत्कार'




## शेतकरी कर्जमाफीसाठी संघर्ष यात्रा टप्पा २









# शेती करण्याचा अभिमान बाळगलाच पाहिजे

**अनिल जैन यांचे उद्गार**

सन्माननिय व्यासपीठ, नान्सी, मित्रांनो, ज्यांना ज्यांना पारितोषिक मिळालं आहे. ते फार खुश असतील. आहेत की नाही? ज्यांना नाही मिळाल त्यांनी हा विचार करायचा आपल्याला पुढच्या वेळी मिळेल. आणि आपणही खुश राहिलो पाहिजे. आणि आपल्या मित्रांना ज्यांना मिळाले त्यांच्यासाठी आम्ही खुश राहिले पाहिजे. मित्रांनो, आपण गेल्या दोन दिवसांमध्ये बरचसं काही पाहिल, बरचसं काही अनुभवलं, तर आपल्याला असं दिसत असेल की साधारणतः जग भरपूर बदलत आहे. एक तीन-चार वर्षा आधी जे होत, आज जे होत आहे, आपण स्वतः बदलतो आहे आणि तशी शेती पण बदलते आहे. तर जेव्हा शेती बदलते तर एक साधारणतः आता असा काळ येतो आहे आपण क्लायमेट चेंजबद्दल ऐकल असेल एक पर्यावरणामध्ये जो बदल होतो आहे तर पर्यावरणामध्ये जो बदल होतो आहे त्याच्यामुळे कदाचित आज जशी आपण शेती करतो तशी आपण पुढे करूही शकणार नाही. आज आपल्याला साधारणतः कल्पना आहे की जुलै ते ऑगस्टमध्ये पाऊस येतो,










भारताच्या
कृषीक्षेत्रातील
भविष्यदर्शी नायकांचे
तृतीय संमेलन २८ व २९
एप्रिल २०१७ रोजी जळगावच्या
जैन हिल्सवर भरले होते. राज्याच्या विविध
भागातून ४७ शाळांमधील सुमारे तीनशे विद्यार्थी
या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या
समारोपप्रसंगी जैन इरिगेशनचे व्यवस्थापकीय
संचालक श्री. अनिल जैन यांनी केलेले हे भाषण...

त्यावेळी आपण पेरणी करतो, त्याच्यानंतर आपण काही उगवल्यावर ते हार्वेस्टींग करतो, पण असे होईल की कदाचित हा पावसाळा जो ह्या चार महिन्यात येतो या चार महिन्यांनंतर न येता त्याच्या आधी येईल किंवा त्याच्यानंतर येईल. आज जेवढा पाऊस येतो त्याच्यापेक्षा पाऊस निम्माही होऊ शकतो. पर्यावरण बदलामध्ये काहीही घडू शकत. तर आज जशी आपण शेती करतो आहे किंवा आपल्या वडीलांनी केली किंवा आपल्या आजोबांनी केली तशी शेती कदाचित पुढे होणार नाही. आणि ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे की जी मुली आणि मुलं आज या फली कार्यक्रमात सहभागी होता आहेत, आपण सर्व लोक या कार्यक्रमात जे काम करता आहेत किंवा आपली जी इच्छा आहे शिकण्याची आणि पुढे चांगली शेती करण्याची, तर त्याच्यासाठी आपल्या सर्वांना एक नेहमी लक्षात ठेवाव लागेल की फलीच्यामार्फत आपल्याला विशिष्ट शिक्षण दिल जात आहे, आपल्याला प्रात्यक्षिक दिली जाता आहेत, आपली प्रत्यक्ष भेट करून आपलं ज्ञान वाढवल जात आहे, पण आपण जर नेहमी हे पक्क ठेवल नाही मनात की मला आयुष्यभर शिकायच आहे. जस जस आपण पुढे जाल, जस जशी आपण स्वतःची शेती सुरू कराल, जसं जसं आपण कृषिउद्योग कराल, जस जस आपण एक नविन बऱ्याचशा मुलांनी मुलींनी हे जे नविन नविन इथे प्रकल्प दिले किंवा कल्पना दिल्या, जे नावीन्य इथे दाखवले तर त्याच्यामध्येही पुढे जाऊन आमुलाग्र बदल होणार आहे. कारण टेक्नॉलॉजी एकदम बदलते आहे, काही मुलांनी ते मोबाईल वरूनच स्प्रे कस करायच पेस्टीसाईड त्याच्या प्रोजेक्टबद्दल दिल. काहींनी ओनियन वगैरे कसं प्रिझर्व कराव, पण ह्या प्रत्येक गोष्टीमध्ये टेक्नॉलॉजी आज बदलते आहे. आपण




गेल्या १० किंवा २० वर्ष आधी हा विचार केला नसेल की गाड्या स्वतःच स्वतःला चालवतील, गाडी चालवायला ड्रायव्हरच लागणार नाही. आणि ती आज सत्यता होते आहे, साधारणतः अमेरीकेसारख्या देशामध्ये पुढच्या १० ते २० वर्षामध्ये जवळजवळ अर्ध्या गाडांमध्ये ड्रायव्हरच राहणार नाही. आणि तस आता ट्रॅक्टरचही होत आहे, ट्रॅक्टरही स्वतःच स्वतः ला चालवतात, त्याच्यासाठी कोणी ट्रॅक्टरवर बसण्याचीही गरज नाही. तर टेक्नॉलॉजीमुळे असे सर्व बदल होता आहेत. आपण बघितल असेल आपल्या टेक्नॉलॉजी पार्कमध्ये की आपण हवेत बटाटा उगवतो आहे की जिथे म्हणजे सॉईलच नाही, जिथे जमीनच नाही हवेतही बटाटा उगतो आहे. तर टेक्नॉलॉजी काय रूप घेऊन आपल्या समोर येईल आणि त्याचा वापर आपण कसा करू याच्याबद्दल आपल्याला नेहमी जागरूक रहाव लागेल. आणि आपण जागरूक राहिलो तरच आपण पुढे जाऊ शकू ही एक गोष्ट झाली. दुसरी जेव्हा तुम्ही फलीचा भाग होता आहे तर आज भारतात किती शेतकरी असतील? कोणाला कल्पना आहे? नंबर कोणाला माहिती आहे? कोणी सांगू शकत? तर एक १२ ते १४ कोटी शेतकरी आहेत, १२ कोटींचा नंबर आहे पण काही लोक म्हणतात जास्तही असतील आणि कोणती भारतातली जी मोजणी केली जाते ती एवढी रिलायबल असत नाही तर साधारणतः १२-१३ कोटी शेतकरी आहेत. आता जे आज शेतकरी १२-१३ कोटी आहेत त्यांची जी पुढची पिढी आहे त्यांना जर आज विचारायला गेलो आपण किंवा तुम्हाला शेती करायला रस आहे का? पुढे करणार का? तर साधारणतः ७० ते ८० टक्के लोक म्हणतात आम्हाला जास्त इच्छा नाही. तर जी लोक शेतीमध्ये राहतील त्यांना फार मोठी शेती करायला मिळेल कारण आज जेवढे शेतकरी एक या १४ कोटी हेक्टर्स क्षेत्रावरती शेती करतात त्यांच्या ऐवजी आणि जेवढे १२ ते १४ कोटी शेतकरी आहेत त्याच्या मला वाटत साधारणतः शेतकऱ्यांची संख्याच १० कोटी पेक्षा कमी होईल. म्हणजे आपणाला, आपण जी मुलं आणि मुली ह्यांना शेतीमध्ये रस आहे आणि आपण जी शेती पुढे करणार त्या सर्वांना फार मोठी जास्त संधी आहे की तुम्ही फार चांगलं काम करू शकाल, कारण की जी लोक आज करता आहेत त्याच्यापेक्षा जवळजवळ ३० ते ३५ टक्क्यांनी शेतकरी कमीच होणार पुढच्या २० वर्षांमध्ये, शेतकरी एवढे राहणारच नाही. आणि जे कमी शेतकरी असतील त्यांना ही सर्व जमीन कसावी लागेल, त्यांना आधुनिक शेती करावी लागेल, त्यांना उत्पादन जास्त कराव लागेल. दुसरा एक भारत देशापुढे प्रश्न आहे की आज आपल्या देशात साधारणतः आपण अन्नधान्य जे म्हणतो गहू, तांदूळ किंवा वेगवेगळे साधारणतः २५० दशलक्ष टन आज आपण बनवतो. तर २५० दशलक्ष टन आज जे आपण अन्नधान्य बनवतो आहे ते आपल्याला २५ वर्षानंतर साधारणतः दुप्पट लागणार आहे म्हणजे ५०० मिलीयन टन लागणार आहे. आणि जी जमीन शेतीसाठी आहे आपल्याकडे ती कमी होणार आहे, कारण शहर वाढत आहेत. त्याच्यामुळे ह्या जमीनी बऱ्याचशा काही रस्त्यांसाठी जातील, शहरांसाठी जातील. तर शेतीची जमीन कमी होणार आहे आणि शेतीमधून आपल्याला जे उत्पन्न वाढवायच आहे ते आपल्याला दुप्पट करावं लागणार आहे. तर जेव्हा शेतीमधले उत्पन्न दुप्पट करायच आहे आणि शेतीची जमीन कमी होणार आहे त्यावेळी जर तुम्ही तंत्रज्ञानाचा वापर करू शकला आणि त्याने आपण जर उत्पादन वाढवू शकला आणि मूल्य जर वाढवू शकला तरच भारताच्या शेतकऱ्यांचे आणि शेतीचे भवितव्य फार चांगले आहे आणि आज तुमचा सर्वांचा एवढा उत्साह बघून मला वाटत की जे काही आपण काम इथे ह्या सर्व कंपन्यांनी मिळून आणि नॅन्सीच्या अथक परिश्रमातून आपण एक जो पाठपुरावा करतो आहे आणि आपल्या सर्वांचे उत्साही सहभाग आहे. आपण हे जे सातत्य राखतो आहे, त्याच्यातून एक फारच नविन क्रांति भारत देशात घडेल असा माझ्या मनात विश्वास आहे. मित्रांनो, आज बऱ्याच

ठिकाणी शेतकरी किंवा शेती, मी शेती करतो आहे अस सांगायला बऱ्याच लोकांना असं फार अभिमान वाटत नाही की मी शेती करतो आहे. मी आयटी कंपनीत आहे, किंवा मी इंजिनीअर आहे, किंवा मी मोठ्या कंपनीत टाय बूट सुट लावून काम करतो आहे अस म्हणणाऱ्यांना फार अभिमान वाटतो. पण मी शेती करतो आहे अस अभिमानाने सांगणारे फार कमी आहेत. भाऊंनी म्हणजे भवरलालजींनी, माझे वडील जे होते त्यांनी त्यांच्या आयुष्यात नेहमी एक उद्देश ठेवला होता की शेतकऱ्याला सन्मानाने जगता यायला पाहिजे. शेतकऱ्याला हे सांगता यायला पाहिजे त्याची मान ताट करून की मी एक फार चांगल काम करतो आहे. आणि मी जे काम करतो आहे त्याच्यामुळेच संपुर्ण जग चालत. मित्रांनो अस म्हणतात की आपल्याला आयुष्यामध्ये डॉक्टर कधीतरी लागतो, वकील कधीतरी लागतो, कोर्टात कधीतरी आपल्याला जाव लागत. आपल्याला शिक्षकाकडेही एक शिक्षणाच्या वेळी जाव लागत. आपण कोणतीही दुसरी गोष्ट घ्या की आपल्याला साधारणतः आयुष्यात ती कधीतरी एक वेळा दोन वेळा लागते. फक्त एकच गोष्ट अशी आहे की जे खायला-प्यायला आपल्याला दिवसातून तीन वेळा लागते. म्हणजे शेतकरी आपल्याला प्रत्येक दिवशी आयुष्याच्या तीन वेळा लागतो. आणि हे दुसऱ्या कोणत्याच व्यवसायात नाही, फक्त शेतकरी या व्यवसायातच आहे. आणि म्हणून शेतकऱ्यांनी आपली मान ताठ ठेऊन पुढे जायच आणि एक सन्मानाने नेहमी जगायचं आणि हे काम आपण सर्व पुढे जाऊन करू शकाल याची माझी नक्की खात्री आहे. आता एकदा जर तुम्ही सन्मानाने जगला आणि तुम्ही विचार केला की मी जे काही करतो आहे किंवा करते आहे हे एक नोबल काम आहे. आणि हे एक असे काम आहे की ज्याच्यामुळे नुसता माझाच स्वतःचा फायदा होणार नाही, याच्यामुळे पर्यावरणाचाही फायदा होईल. मी जे काही करतो आहे किंवा करते आहे त्याच्यामुळे पुर्ण समाजाचा फायदा होईल. कारण आज शेतकरी आहे आणि शेतकरी स्वतःच त्रास सहन करून दुसऱ्यांसाठी जे अन्न बनवतो त्याच्यामुळेच सोसायटी पुढे चालते. आणि तस जर झाल नाही किंवा तस जर घडल नाही तर आपला समाज किंवा सोसायटी किंवा मानवजात संपून जाईल. त्याच्यामुळे तुम्ही जो व्यवसाय आज निवडला केल आहे आणि तुमच्या मनात ही जी इच्छा, आकांक्षा आणि एक महत्त्वाकांक्षा आहे की आम्हाला एक चांगला शेतकरी बनायचं आहे, आम्हाला शेती उद्योग करायचा आहे, आम्हाला मूल्यवर्धनाचे काम करायचं आहे, आम्हाला नफ्यातला व्यवसाय करायचा आहे, तर हे एक आपल्या भारतासाठी, भारतातल्या शेतीसाठी ही एक फार चांगली नांदी राहिल. आणि असे जर आपण करू शकला तर त्या कामामुळे जे संपूर्ण भारत बऱ्याचवेळी आपण ऐकत असाल की आपल्याला भारताला सुपरपॉवर करायच आहे. भारत सुपरपॉवर म्हणजे अमेरीका आहे, रशिया आहे, ह्यांना सुपरपॉवर म्हणतात. तर बऱ्याचवेळी जेव्हा आपण म्हणतो की भारताला सुपरपॉवर करायचं आहे तर आपण विचार करतो की आमच्याकडेही न्युक्लिअर मिसाईल असतील, आमचेही विमाने असतील, मित्रांनो त्याच्यामुळे नाही सुपरपॉवर होणार! ज्या दिवशी भारताचा प्रत्येक शेतकरी स्मार्ट शेतकरी होईल आणि फली सारखा शेतकरी होईल त्या दिवशीच भारताची सुपरपॉवर होईल. (टाळ्या) तर तसा विचार केला तर तुम्ही जर स्वतःबद्दल विचार केला की भारताची आणि भारताला सुपरपॉवर करण हे माझ काम आहे. नुसती शेती करण हे माझ काम नाही. समाजाला पुढे जाण्यासाठी मदत करण हे माझ





काम आहे. मी स्वतःसाठी तर काम करीनच स्वतःसाठी शेती करीनच, स्वतःसाठी मी पैसे कमाविनच. आणि मी जेव्हा पैसे कमविल तेव्हा मी ती शेती जे आहे एक शाश्वत पद्धतीने करेल. ज्याच्यामुळे की आजच नाही ५ वर्षांनी, १० वर्षांनी, २० वर्षांनी सुद्धा मला एक चांगल्या शेती करीता मी पाणी वाचविन, आणि मी जमीनीचा पोत चांगला ठेविन आणि संपूर्ण शेतीची उत्पादकता वाढेल. आणि मी जे काही करेल तेव्हा मी एक कोड ऑफ कन्डक्ट फॉलो करेल. आज आपण कधी कधी ऐकतो काही शेतकरी जे असतात ते आपल जे काही फळ असेल, भाजीपाला असेल, कोणी इंजक्शन टाकत आहे, कोणी केमीकल टाकत आहे, कोणी दुधात डिटर्जनंट पाऊडर मिळवत आहे असेही काही काही लोक करायला लागले आहेत. पण तुम्ही जे फलीची लोक आहेत आणि Future Leaders of Indian Agriculture म्हणून तुम्ही सहभागी होता आहेत तर ह्याच्यावेळी तुम्हाला कोड ऑफ कन्डक्ट आपल्यातर्फे ठेऊन की मी जे काही करीन ते योग्य करीन मी जे काही काम करीन ते चांगल काम करीन आणि प्रत्येक काम करताना, आयुष्यातलं कोणतही काम करताना मी माझा एक जो याला आपल बेंचमार्क म्हणतात की जो एक मानांक मला ठेवायचा आहे तो मी बेस्ट ठेवीन. म्हणजे मी कधीही स्वतःला दुसर मानणार नाही. आपण जेव्हा समजा कोणी विचार केला की मला द्राक्ष करायची आहेत एक उदाहरण तर द्राक्षामध्ये विचार असा करायचा की दुनियेत सर्वात जास्त द्राक्ष कोण बनवितो? एका एकरामध्ये कोणी समजा १० टन बनविल असेल तर विचार असा करायचा की मी ११ टन कसा बनवेल? जर तुम्ही असा विचार केला तर तुम्ही करू शकता. आज ही जळगावची आपली कंपनी जैन इरिगेशन भाऊंनी माझ्या वडीलांनी जेव्हा सुरू केली ती ७ हजार रुपयांची होती. पण त्यांनी विचार ७ हजार रुपयांचा नाही केला, त्यांनी नेहमी असा विचार केला की मी जी आज कंपनी बनविन जी शेतकऱ्यांसाठी राहील ती कंपनी आज दुनियेतली सर्वात चांगली कंपनी होऊ शकते. आणि तिच कंपनी सात हजार रुपयांपासून आज सात हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली ती फक्त एका माणसाच्या विचारामुळे. आणि त्याच्या विचारांमुळे आणि त्याच्या स्वप्नांमुळे. आणि त्या विचारांना आणि स्वप्नांना, त्यांनी अथक परिश्रमाची जोड दिली त्याच्यामुळे हे घडू शकल. आणि मला वाटत की आपल्या सर्वांमध्ये अशी गुणवत्ता आहे की आपणही आपली स्वतःची शेती किंवा कृषीउद्योग जे काही कराल त्याची किर्ती आणि त्याची एक स्केल म्हणतात त्याला त्याची जी लेव्हल आहे ती तुम्ही नॅशनल आणि इंटरनॅशनलला घेऊन जाऊ शकता. आणि त्याच्यासाठी आजच नाही पण १ वर्षानंतर, ३ वर्षानंतर, ५ वर्षानंतर, १०-२० वर्षानंतर केव्हाही तुम्हाला काहीही मदत पाहिजे असेल तर जैन इरिगेशन नेहमीच आपल्यासाठी इथे राहिल.

मित्रांनो, तुमच्यापुढे आता पुर्ण आयुष्य अजून आहे, तुमच आयुष्य फक्त १५-१६ वर्ष आहे. अस म्हणतात की आपल मेडिकल किंवा हेल्थमध्ये ज्या टेक्नॉलॉजीज् येता आहेत त्याच्यामध्ये साधारणतः ५० वर्षानंतर अशा टेक्नॉलॉजीज येतील की कदाचित मनुष्य मरणारच नाही, अमर होईल अशा टेक्नॉलॉजीज् येता आहेत. समजा तुमचा हात तुटला तर नवीन हात ऑटोमॅटीक निर्माण होईल अशाही टेक्नॉलॉजीज् येता आहेत. तुम्हाला सर्व हे बघायला मिळणार आहे, कारण तुम्ही एवढे तरुण आहात की ५०-६० वर्ष तुम्ही अजून जगून ६०, ७०, ८० तुम्ही हे सगळ बघू शकतात. पण ते बघायला आणि ते जेव्हा जस काही ही टेक्नॉलॉजी घडेल किंवा लोक मंगळावर जायच म्हणता आहेत किंवा ज्या काही नवीन गोष्टी घडता आहेत आपल्याला त्या सर्व बघता येतील. ही एक फार मोठी अशी एक पर्वणी तुमच्याकडे आहे की जी आधीच्या

पिढ्यांना उपलब्ध नव्हती.

आज तंत्रज्ञान आणि इतिहास एवढा वेगाने बदलतो आहे की याची कल्पनाच आजपर्यंत कोणी केली नाही. ते सर्व बघण्याची तुम्हाला संधी आहे. म्हणून तुम्ही, मला तर अस वाटत की एक भाग्यशाली पिढी जी म्हणतात ती तुमची आहे. मिलेनीयन किंवा एक्स जनरेशन, वाय जनरेशन, झेड जनरेशन जी काही आहे ती पुढची लेटेस्ट पॉसिबीलीटीज् तुम्हाला बघायला मिळतील. ते आम्हाला बघायला मिळाल नाही. आधीच्या पिढीला तर नाहीच नाही. तर तुम्ही एकदम ब्लेस्ट आणि फॉर्चुनेट आहात, पण ह्या संधीचा फायदा घेऊन तुम्ही आपल्या या पृथ्वीला, आपल्या पृथ्वीसाठी काय करू शकाल, आणि तुम्ही स्वतःसाठी जे काही कराल ते चांगल्या रितीने कराल का? असे प्रश्न तुम्ही नेहमी स्वतः साठी ठेवा. आणि प्रत्येक वेळी आपल्याला दुसऱ्याबरोबर स्पर्धा करण्याची गरज नाही की तो अस करतो म्हणून मला अस करायच आहे. आपली स्पर्धा नेहमी स्वतःसाठी पाहिजे की मी आज हे केल, उद्या मी काल केल त्याच्यापेक्षा चांगल करू शकतो. आणि प्रत्येक वेळी तुम्ही स्वतःबरोबरच जर स्पर्धा ठेवली की काल पेक्षा मी आज चांगल कस करेल, आज सकाळी केल त्याच्यापेक्षा आज संध्याकाळी जास्त कस करेल असा जर नेहमी विचार करून जर तुम्ही पुढे गेला तर आयुष्यात तुम्ही कधीच कमी पडणार नाही आणि नेहमीच यशस्वी व्हाल असा एक माझा नक्की विश्वास आहे.

आणि तुम्हाला या पुढच्या आयुष्याच्या प्रवासामध्ये जो मला वाटतो फार उत्साहवर्धक आहे आणि फार सकारात्मक तुमचा प्रवास आहे त्या प्रवासामध्ये तुम्ही यशस्वी व्हाव अशी तुम्हाला शुभेच्छा देतो. आणि ह्या पुर्ण प्रवासामध्ये कधीही कुठेही तुम्हाला जर मदत पाहिजे असेल कमतरता भासत असेल, ज्ञान पाहिजे असेल, रिसोर्सेस पाहिजे असतील, मार्केट पाहिजे असेल, काहीही पाहिजे असेल तर त्याच्यासाठी तुम्ही कधीही संकोच न करता जैन इरिगेशनकडे तुम्ही कॉन्टॅक्ट करायला या आणि आम्ही तुमच्याबरोबर नेहमीच राहू ही तुम्हाला एक ग्वाही देऊन मी माझे दोन शब्द संपवतो.

## 'फली'मध्ये ४७ शाळेतील ३०० विद्यार्थी सहभागी

भारताच्या कृषीक्षेत्रातील भविष्यदर्शी नायकांचे तृतीय संमेलन २८ व २९ एप्रिल २०१७ रोजी जळगावच्या जैन हिल्सवर भरले होते. राज्याच्या विविध भागातून ४७ शाळांमधील सुमारे तीनशे विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. 'फली' (फ्युचर ॲग्रिकल्चरल लिडर्स ऑफ इंडिया) या नावाने हा कार्यक्रम ओळखला जातो. बायर, युपिएल लि., गोदरेज ॲग्रोवेट आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. जळगाव या चार कंपन्यांनी या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व स्वीकारले होते. आता गुजरातमधील 'अमूल' ही कंपनीही पुढील वर्षापासून या कार्यक्रमात सहभागी होणार आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मुला-मुलींना लहानपणापासूनच शेती व शेतीशी संबंधित असणारे निरनिराळे उद्योगधंदे करण्याची आवड लागावी. शेतीशी व विशेषतः आधुनिक शेतीशी संबंधित असणारे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान याची त्यांना शालेय जीवनापासूनच ओळख होऊन त्यांनी पुढील आयुष्यात या क्षेत्रात संशोधन व रोजगार निर्मितीचे काम करावे हा आहे. यासाठी शेती व पूरक व्यवसायासंबंधीची मॉडेल्स (प्रारुपे) तयार करण्याची स्पर्धा या मुलांमध्ये लावली जाते. शाळांमध्ये जाऊन मुलांना ही मॉडेल्स कशी तयार करावयाची याचे प्रशिक्षण दिले जाते. डिसेंबर २०१६ ते जानेवारी २०१७ या दोन महिन्यांच्या काळात दोन ते चार मुलांचे असे ६६० गट तयार करून येथील संमेलनात ज्या ४७ गटांनी भाग घेतला होता त्यांच्या मॉडेल्स व प्रयोगांची तज्ज्ञ समितीने पाहणी करून त्यांना बक्षिसे देण्यात आली. हा बक्षिस समारंभ जैन इरिगेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अनिल जैन यांच्या शुभहस्ते पार पडला. 'फली' कार्यक्रमात सहभागी झालेल्या ८-९ वी च्या विद्यार्थ्यांनी सुरुवातीला आपल्या प्रयोगाचे सादरीकरण केले. मुलांची संख्या मोठी असल्यामुळे बडा हण्डा हॉल व परिश्रम सभागृह अशा दोन ठिकाणी सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणात साधारणपणे सोयाबीनपासून पनीर बनविणे, घरीच मश्रूम तयार करणे, कडकनाथ कोंबडीचे पालन, पापड उद्योग, हायड्रोपोनिक्स, गांडुळ खत निर्मिती, केळीच्या धाग्यांपासून बॅग व इतर वस्तुंची निर्मिती, कडुनिंबापासून विविध उत्पादने बनविणे, रेशीम कोषाची निर्मिती, तुती लागवड, सीताफळ ज्यूस, शेततळे व मासे संगोपन, आवळा जाम, जाफ्राबादी म्हशीचे पालन, शाश्वत शेती, पाणी व्यवस्थापन व सिंचन पद्धती, हात कोळपणी यंत्र, सायकलवरील मका पेरणीयंत्र यांसारख्या अनेक विषयांची सर्वांगीण माहिती विद्यार्थ्यांनी चित्रासह सादर केली. त्यांना उपस्थितांनी प्रश्न विचारले. त्यानंतर या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेल्सचे प्रदर्शनही भरविण्यात आले.

या प्रदर्शनात सोलर फेन्सिंग, ॲटोमॅटीक स्प्रेअर मशीन, विहिरीतला वाजणारा अलार्म, मँगोफ्रूट हार्वेस्टर, बॅटरीवर छोटी झाडे कापणारे मशीन, होममेड सोलर कुकर, वीजनिर्मिती, ऊस पेरणी व कापणी मशीन, आंतरपिकासाठी टोकण यंत्रण, पक्षी हाकलणारे यंत्र अशी विविध प्रकारची मॉडेल्स ठेवण्यात आली होती. त्यांचे हे प्रात्याक्षिक पाहणेही मोठे आनंददायी होते. मुलांची कल्पकता किती प्रगल्भ असू शकते याचे हे प्रदर्शन हा उत्कृष्ट नमुना होता.

Post Regn. No. : MCS/208/2017-19
Published on 15th of every month, posted on 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001.
RNI No. : MAHMAR / 2008 / 39849

# ऊसासाठी जैन ठिबक आता फक्त एकरी १७,४६३* ...यात उपलब्...

MANISH, J.H.
Page 66

जैन ठिबकचा ऊसासाठी ५' x १.५०' अंतराकरीता अंदाजे एकरी खर्च

| जैन ठिबक संचाचे विविध पर्याय | अंदाजे खर्च* |
|---|---|
| टर्बो स्लिम १२ मिमी, ६ मिल, ५० से.मी. | १७,४६३ |
| टर्बो स्लिम १६ मिमी, ६ मिल, ५० से.मी. | १९,१०५ |
| टर्बो एक्सेल १२ मिमी क्लास १, ५० से.मी. | २२,०२४ |
| टर्बो एक्सेल १६ मिमी क्लास १, ५० से.मी. | २७,७१९ |
| टर्बो एक्सेल १२ मिमी, क्लास २, ५० से.मी. | ३०,८०५ |
| टर्बो एक्सेल १६ मिमी, क्लास २, ५० से.मी. | ४०,७३८ |

जैन इनलाईन - पिकांच्या पाण्याच्या गरजेनुसार, विविध प्रवाह व साईज मध्ये तसेच दोन ड्रिपर्स मधील वेगवेगळ्या अंतरासह उपलब्ध !

* नियम व अटी लागू




जैन® ठिबक

अस्सल माल, अस्सल माणसं !

टोल फ्री नं. १८०० ५९९ ५०००; ई-मेलः jisl@jains.com; वेबसाईटः www.jains.com

**त्वरा करा ! ऊसाचे उत्पादन व गोडी वाढवा - जैन ठिबक विक्रेत्याशी संपर्क साधा.**